(१)

दूरध्वनी : २८४ १५ ७६ / २०२ ६२ ४९ फॅक्स : २०२ ९३ ४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

जा.क्र.मजीप्रा/सस/बैठक-९५/(३)/आ-४. दिनांक : ८.७.२००३

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (लेखा व कोषागरे), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उर्जा (उर्जा व कामगार) विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

विषय : मंगळवार दिनांक २९ मार्च, २००३ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४व्या सभेचे इतिवृत्त तसेच दि. १२.५.२००३ रोजी झालेल्या ९५ सभेचे इतिवृत्त..

महोदय,

दिनांक २९ मार्च, २००३ रोजी झालेल्या प्राधिरकणाच्या ९४व्या सभेचे तसेच दि. १२.५.२००३ रोजी झालेल्या ९५व्या सभेचे मंजूर इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे. या इतिवृत्ताचे अवलोकनावरुन इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास या कार्यालयास कळविण्यांत यावेत, ही विनंती.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपला,

(शेखर गायकवाड)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : ९४ सभेचे इतिवृत्त
पृष्ठ क्र.२ ते ९
९५ सभेचे इतिवृत्त व १ ते ३

..२..

प्रत,

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या खालील कार्यक्रम बाबीवर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ततेचा अहवाल त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

अ) ९४ सभेपुढील कार्यक्रम बाबी क्र. ३,४,५,६,८,९,१०,११,१८,१९,२१,२२ व २७
आयत्यावेळचे कार्यक्रम बाब क्र.१ व ३.
ब) ९५ सभेपुढील कार्यक्रम बाबी क्र. ५ व १०
आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१

अधीक्षक अभियंता, समन्वय, नवी मुंबई / मुंबई.

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या खालील कार्यक्रम बाबीवर सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

अ) ९४ सभेपुढील कार्यक्रम बाब क्र. १२,१५,१६,१७,२०व २८
आयत्यावेळचे कार्यक्रम बाब क्र. २,४,५
ब) ९५ सभेपुढील कार्यक्रम बाब क्र. ३,४,७,८,९,११.

उप मुख्य लेखा अधिकारी - १/२/३, म.जी.प्रा., नवी मुंबई.
कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा.,नवी मुंबई.
कक्ष / कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/२/३/४/५/६/७.

आपल्या कक्षासबंधी असलेल्या संबधीत कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल आ-४ शाखेकडे पाठवावीत.

nng..Sabha..

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९४ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९४ वी सभा मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.नामदार श्री.आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९ मार्च, २००३ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाली. या सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) श्री.आर.आर.पाटील, मा.मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष.
२) श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्षा.
३) श्री.बी.सी.खटुआ, सचिव, पा.पु. व स्व. विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
४) श्री.एस.एस.हुसेन, सचिव, ग्रा.वि.वि.तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
५) श्री.जयंतराव कावळे, सचिव, उर्जा तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
६) श्री.दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.एस.व्ही.वाघ, मुख्य अभियंता (को.वि.), म.जी.प्रा. ठाणे.
२) श्री.अ.बा.सावंत, वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा. नवी मुंबई.
३) श्री.शेखर गायकवाड, मु.प्र.अ., म.जी.प्रा., मुंबई.
४) श्री.मिलिंद केळकर, विशेष कार्य अधिकारी, पा.पु.व स्व., मंत्रालय, मुंबई.
५) श्री.वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
६) श्री.वि.ना.शिंगवेकर, अधीक्षक अभियंता (मनिसंसं), म.जी.प्रा., नवी मुंबई.
७) श्री.ए.एस.शिरुडे, उप मुख्य लेखा अधिकारी (३), म.जी.प्रा., नवी मुंबई.

मा.मंत्री, ग्रा.वि.पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ व्या सभेचे इतिवृत्त सभेस सादर केले त्यावर चर्चा झाली आणि इतिवृत्तास रीतसर मान्यता प्रदान करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ व्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही सदस्य सचिव यांनी विशद केली. प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली.

कार्यक्रम बाब क्र.३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००२-२००३ या वर्षाचे सुधारित अंदाजपत्रक व सन २००३-२००४ या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

(१) सन २००२-२००३ च्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मजीप्राच्या ९२ व्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये प्रत्यक्षात झालेले बदल विचारात घेवून तसेच महसूली व भांडवली जमा खर्चाचा तपशील सभेसमोर मांडून सन २००२-२००३ चे सुधारित अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर केल्याचे मजीप्राचे वि.स.व मु.ले. अ. यांनी स्पष्ट केले व त्यास मान्यता देण्याची विनंती केली. या सुधारित अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| | महसूल जमा खर्च | | भांडवली जमा खर्च | |
|---|---|---|---|---|
| | मूळ अंदाज | सुधारित अंदाज | मूळ अंदाज | सुधारित अंदाज |
| जमा | २९६२९.३३ | २२५०७.२६ | ८५१८७.२० | ५७५१२.९२ |
| खर्च | २८७९५.९६ | २२५०७.२६ | ६९६७५.१६ | ५७५१२.९२ |

या सुधारित अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने सर्वसाधारण चर्चा करण्यात आली . या चर्चेच्यावेळी मा.अध्यक्षांनी ई.टी.पी.उत्पन्न कमी होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. रु.७५ लाखापेक्षा कमी किंमतीच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदांनी राबवावयाच्या असल्याने या कामावरील ई.टी.पी.उत्पन्न कमी झाले आहे. तसेच पुणे, नाशिक, जळगांव, शिरपूर सारख्या महानगरपालिका/नगरपालिका १७.५ टक्के ई.टी.पी. आकार जास्त आहे म्हणून म.जी.प्रा.कडे काम देत नसल्यानेही उत्पन्न घटत आहे, यावर उपाययोजना करावी असे सूचित केले. त्यावर सचिव, पा.पु. यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी विचार विनिमय करुन काही सुधारणा करणे शक्य होईल असे नमूद केले. तसेच याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येईल असे स्पष्ट केले. यास मा.अध्यक्ष महोदयांनी संमती दर्शविली. व चर्चेनंतर सन २००२-२००३ च्या सुधारित अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास एकमताने मान्यता देण्यात आली.

(२) त्यानंतर सन २००३-२००४ च्या अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने विवरणपत्र ३ व ४ नुसार वि.स.व मु.ले.अ. यांनी तपशीलवार विवेचन करुन सन २००३-२००४ चा अर्थसंकल्प प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला. या अर्थसंकल्पाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे -

( रु.लाखात)

| अर्थसंकल्पीय अंदाज वर्ष २००३-२००४ | | | |
|---|---|---|---|
| महसूली जमा | महसूली खर्च | भांडवली जमा | भांडवली खर्च |
| २८३९९.९३ | २८३९९.९३ | ९४६४८.८१ | ९४६४८.८१ |

सन २००२-२००३ च्या मजीप्राचा सुधारित कार्यभार रु.५७४.१० कोटी असून सन २००३-२००४ साठी हा कार्यभार रु.९५२.१२ कोटी अंदाजित असल्याचे वि.स. व मु.ले.अ. यांनी स्पष्ट केले. तसेच यामागची कारणेही विशद केली.

या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येवून सन २००३-२००४ च्या रु.२८३९९.९३ लक्ष किंमतीच्या महसूली जमा खर्चास व रु.९४६४८.८१ लक्ष किंमतीच्या भांडवली जमा खर्चाच्या अंदाजपत्रकास एकमताने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रकल्प क्षेत्र, न्हावा-शेवा व प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयाचे दर सन २००३-२००४ साठी सुधारित करणेबाबत.**

मजीप्राकडून प्रकल्प क्षेत्रातील अंबरनाथ बदलापूर नगरपरिषद, न्हावा शेवा पा.पु. योजनेअंतर्गत सिडको, नवी मुंबई मनपा, पनवेल नगर परिषद, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना व प्रकल्प क्षेत्राबाहेर २६ नगरपरिषदा / महानगरपालिका तसेच लष्कर पा.पु. व ५ गिरीस्थाने अशा ४ क्षेत्रात पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे या ४ क्षेत्रासाठी पूलरेट पध्दतीने दर ठरविणे मजीप्रास क्रमप्राप्त ठरते. याबाबतची वस्तुस्थिती व प्रस्ताव खालीलप्रमाणे असल्याचे वि.स. व मु.ले.अ. यांनी स्पष्ट केले.

अ) **प्रकल्पक्षेत्र :** मजीप्रा प्रकल्प टप्पा-१ अंतर्गत जागतिक बँक अर्थसहाय्यित पा.पु. योजना ज्या ठिकाणी राबविण्यात आल्या आहेत त्यापैकी अंबरनाथ बदलापूर शहरासह ऑर्डनन्स फॅक्टरी साठी मजीप्राकडून पा.पु. करण्यात येतो. या ठिकाणी प्राप्त होणा-या महसूलामधून खर्च भागतो, व जागतिक बँकेच्या कराराप्रमाणे ६ टक्के अधिक्य प्राप्त होऊन काही जास्तीचा महसूल प्राप्त होतो. तो प्रकल्प क्षेत्राबाहेर येणारी तूट भरुन काढण्यासाठी वापरण्यात येतो. त्यामुळे विद्यमान दरामध्ये सन २००३-२००४ या वर्षाकरिता दरवाढ प्रस्तावित करण्यात आलेली नाही.

ब) **न्हावा-शेवा पा.पु. योजना (सिडको) :-** या ठिकाणच्या पाणीपट्टी मधून मिळणा-या महसूलामधून खर्च भागतो, व जी शिल्लक अपेक्षित आहे ती प्रकल्प क्षेत्राबाहेरील पाणी पुरवठयापोटी असणा-या तुटीसाठी वापरणे प्रस्तावित आहे. त्यामुळे विद्यमान पाणी पुरवठा दरामध्ये सन २००३-२००४ साठी दरवाढ प्रस्तावित नाही.

क) **प्रकल्प क्षेत्राबाहेरची पा.पु.केंद्रे :** या ठिकाणी प्राप्त होणा-या महसूलामधून व वरील २ क्षेत्रातील अपेक्षित उत्पन्न विचारात घेऊनही २००३-२००४ मधील खर्च भागत नसल्याने १०% च्या प्रमाणात दरवाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. वरीलप्रमाणे १० टक्के दरवाढ (रुपयाशी पूर्णांकित करुन) करणे क्रमप्राप्त असल्याचे वि.स. व मु.ले.अ. यांनी स्पष्ट केले. यामध्ये ठोक पुरवठा दर किरकोळ दराएवढे येत असल्याने त्यात काहीतरी फरक असणे योग्य होईल म्हणून ठोक दराने वाढ प्रस्तावित नाही हेही स्पष्ट करण्यात आले.

ड) **गिरीस्थाने :** गिरीस्थानांसाठी बिगर घरगुती दरामध्ये सन २००१-२००२ या वर्षामध्ये मोठया प्रमाणात वाढ केली होती. तथापि, तेथील बिगर घरगुती वापरदारांनी (विशेषतः माथेरान येथील हॉटेल मालकांनी) वारंवार दर कमी करण्याची विनंती केली होती. या सर्वाचा सर्वकष आढावा घेवून सन २००१-२००२ पासून २००३-२००४ पर्यंत लागू करावयाचे सुधारित दर या कार्यक्रम बाबीद्वारे प्रस्तावित केले आहेत. या प्रवर्गातील क वर्ग हॉटेल्स व इतर असे एकत्र दर न ठेवता क वर्ग हॉटेल करिता व इतरांकरिता असे स्वतंत्र दर

प्रस्तावित आहेत. त्यानुसार पूर्वीचे दर कमी करण्याचे प्रस्तावित आहे तर घरगुती दरामध्ये (त्यांचे दर कमी असल्याने ) साधारणत: १० टक्के वाढ केल्याचे स्पष्ट केले.

या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येवून व प्रत्येक संवर्गासाठी कोणते दर येतील हे विचारात घेवून वरील प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र.५ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००१-२००२ या वर्षाचे लेखे स्वीकृत करणेबाबत (अनुसमर्थनार्थ)

मजीप्राचे सन २००१-२००२ चे वार्षिक लेखे स्वीकृत स्वरुपात महालेखापालांना सादर करणे आवश्यक असल्याने याबाबतची कार्यक्रम बाब सदस्यांमध्ये फिरवून मंजूर करुन घेण्यात आली आहे, ती अनुसमर्थनार्थ सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. याबाबत सचिवांनी २०००-२००१ च्या लेख्याबद्दल महालेखापालांनी दिलेल्या प्रतिकूल प्रमाणपत्राचा उल्लेख केला. व याबाबत सुधारणा करण्यास वाव असून तशी कार्यवाही चालू असल्याचे नमूद केले. तसेच, त्यांनी महालेखापालांशी चर्चा करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. निलंबन लेख्यातील प्रलंबित बाबींचा निपटारा करुन झालेल्या प्रगतीचा व सुरु असणा-या कार्यवाहीचा तपशील वि.स.व मु.ले.अ. यांनी सादर केला. त्यानंतर या प्रकरणी सर्वसाधारण चर्चा करण्यात येवून मजीप्राच्या सन २००१-२००२ च्या वार्षिक लेख्यांच्या स्वीकृतीस रीतसर मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र. ६ : न्हावा-शेवा पाणी पुरवठा केंद्रातून होणा-या पाणी पुरवठयासाठी २००२-२००३ करिता सुधारित दर आकारण्याबाबत.

मजीप्रा कायदा १९७६ कलम २७ अन्वये मजीप्रास आपला कारभार शक्यतो विना तोटा चालवावयाचा आहे. म्हणजेच पाणी विक्रीपोटी येणा-या महसूलामधून पा.पु.केंद्राची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती होणे व काही फायदा होणे अपेक्षित आहे. न्हावा-शेवा पा.पु.केंद्रामधून सिडको, जे.एन.पी.टी., पनवेल नगरपरिषद व नवी मुंबई महानगरपालिका यांना पाणी पुरवठा करण्यात येतो यांचे पाणीपट्टीचे दर वेगवेगळे आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांचा पाण्याचा विद्यमान दर रु.६.७५ प्रति १००० ली. हा सिडकोला मजीप्रा लावत असलेल्या दरा इतकाच करावा अशी सातत्याने विनंती केलेली आहे. याबाबत शासनाने आढावा घेवून हे दर जानेवारी, २००३ पासून रु.६ प्रति १००० लिटर्स करावेत असे निर्देश दिलेले आहेत. सिडकोने एकूण ५० द.ल.लि. पाणी क्षमतेसाठी भांडवली रक्कम उपलब्ध करुन दिली असल्याने सिडको व नवी मुंबई महानगरपालिका यांना एकूण ५० द.ल.लि. पर्यंत सवलत देण्याबद्दल विचार करण्याची वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी विनंती केली. या पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी असणारा नफा विचारात घेता पाणी पट्टीचे दर जानेवारी, २००३ पासून रु.६ प्रति १००० लिटर्स करणे शक्य असल्याचे चर्चेत सांगण्यात आले. या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येवून जानेवारी, २००३ पासून नवी मुंबई महानगरपालिकेचे पाणी पुरवठयाचे सवलतीचे दर रु.६ प्रति १००० लिटर्स करण्यास मान्यता देण्यात आली.

क्रमी

न

कार्यक्रम बाब क्र. ७ : सन २०००-२००१ या वर्षाच्या वार्षिक अहवालास मान्यता देणे.

मजीप्राच्या सन २०००-२००१ च्या वार्षिक अहवालाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येवून (वरील विषय क्र.५ मधील चर्चेच्या अधीन राहून) हा वार्षिक अहवाल मान्य करण्यात आला. व सदर अहवाल विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र. ८ : सन २०००-२००१ या वर्षाच्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास मान्यता देणे.

मजीप्राचे सन २०००-२००१ चे वार्षिक लेखे महालेखापाल, लेखापरिक्षण, मुंबई यांनी प्रमाणित केलेले असून सदर लेखा परिक्षण अहवाल अनुपालनासह मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याचे वि.स.व मु.ले.अ. यांनी स्पष्ट केले. लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे व त्याबाबतची स्पष्टीकरणे यावर चर्चा करण्यात येवून चर्चेअंती लेखापरिक्षण अहवाल त्यावरील अनुपालनासह मान्य करण्यात आला. हा अहवाल विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यासाठी शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र. ९ : स्थानिक स्वराज्य संस्थाकडील थकबाकी वसुलीसाठी पाणीपट्टीवरील विलंब आकार तसेच कर्जावरील दंडनीय व्याज यात सवलतीची निर्भय योजना.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पाणीपट्टी व पाणी पुरवठा / मलनि:सारण योजनांसाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी खूप मोठी थकबाकी असून या थकबाकी वसुलीसाठी सातत्याने प्रयत्न करुन देखील थकबाकीमध्ये सुधारणा होत नसल्याची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे असणा-या थकबाकीमध्ये विलंब आकाराचे (पाणी पट्टीच्या थकबाकी वरील विलंब आकार व कर्जाच्या थकबाकीवरील दंडनीय व्याज) प्रमाण मोठे आहे. एकूणच अपेक्षेनुसार थकबाकी वसूल होत नसल्याचे निदर्शनास आल्याने अशा स्थितीत थकबाकी वसुलीसाठी एक परिणामकारक उपाययोजना म्हणून मूळ पाणीपट्टी तसेच मुद्दल व व्याजाच्या मुळ हप्त्यांची रक्कम विहित मुदतीत भरल्यावर विलंब आकार दंडनीय व्याजात काही सवलती दिल्यास थकबाकी वसुल होईल असे वाटते. यासाठी एक प्रोत्साहनात्मक योजना म्हणून निर्भय योजना राबवावी असे प्रस्तावित असून त्यात खालीलप्रमाणे प्रमुख अटी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

१. ही योजना जाहीर केल्यानंतर योजनेत सहभागी होणा-या संस्थांनी एक महिन्याच्या आंत त्यांच्या नांवाची नोंदणी ठरावासह करणे बंधनकारक राहील.

२. ही योजना जाहीर झाल्यानंतर दोन महिन्याच्या आंत लेख्यांचा ताळमेळ घालून थकबाकी निश्चित करणे बंधनकारक राहील.

३. नोंदणीच्या दिनांकापासून पहिल्या तिमाहीत पूर्ण थकबाकी भरल्यास विलंब आकाराची संपूर्ण रक्कम माफ करणे, दुस-या तिमाहीत पूर्ण रक्कम भरल्यास ९० टक्के विलंब आकार माफ करणे, तिस-या तिमाहीत रक्कम भरल्यास ८० टक्के विलंब आकार माफ करणे, व चौथ्या तिमाहीत रक्कम भरल्यास ७० टक्के विलंब आकार माफ करणे.

उपरोक्त ठळक वैशिष्टये असलेल्या या योजनेवर चर्चा करण्यात येवून या योजनेस मान्यता देण्यात आली. या बाबतचा प्रस्ताव रीतसर शासनास सादर करुन त्यास शासनाची मान्यता घेण्याचेही ठरविण्यात आले. व शासनाच्या मान्यतेनंतरच ही योजना अंमलात आणावी असेही मान्य करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १० : उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी देयकावरील विलंब आकार माफ करणेबाबत.**

ज्या स्थानिक स्वराज्य संस्थाकडे मजीप्राची वसुली प्रलंबित आहे त्या वसुलीसाठी पाणीपट्टीवरील विलंब आकार, कर्जावरील दंडनीय व्याज इ. बाब सवलत देण्यासाठी निर्भय योजना मान्य करण्यात आली असून त्यास शासनाची मान्यता मिळताच सदर योजनेची अंमलबजावणी करावयाचे ठरविण्यात आल्याने उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणी देयकावरील विलंब आकार माफ करणेबाबत स्वतंत्रपणे विचार करण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. जो नियम इतर स्थानिक स्वराज्य संस्थाना लागू होईल तोच उल्हासनगर महानगरपालिकेसाठी राहील त्यामुळे प्रस्तुत कार्यक्रम बाबीबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची आवश्यकता नसावी असे मत सर्व सदस्यांनी व्यक्त केले. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेकडे असणा-या पाणी पट्टीवरील विलंब आकार माफ करण्याचा प्रस्ताव स्वीकृत करण्यात आला नाही.

**कार्यक्रम बाब क्र. ११ : पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित निवृत्ती वेतन व इतर निवृत्ती लाभ प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना लागू केल्यामुळे अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी ई.टी.पी.उपांगांमध्ये सुधारणा करणेबाबत.**

मजीप्राकडून राबविण्यात येणा-या बहुतांश पा.पु. योजनांसाठी १७.५ टक्के ई.टी.पी. मिळतो. या ई.टी.पी. च्या विवरणामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| आस्थापना खर्च | - | १४ % |
| मध्यवर्ती कार्यालय व लेखा परिक्षण खर्च | - | १ % |
| निवृत्ती वेतन खर्च | - | २ % |
| हत्यारे व अवजारे | - | ०.५ % |
| | | एकूण १७.५० % |

निवृत्ती वेतनापोटी विद्यमान १७.५० टक्के ई.टी.पी. चार्जेसमध्ये १ % तरतूद आहे. त्या तरतुदीमधून निवृत्तीवेतनाचा खर्च भागत नसल्याचे निदर्शनास आल्याने दि. १.४.२००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने निवृत्तीवेतनापोटी १७.५० टक्के ई.टी.पी. चार्जेसमध्ये वरीलप्रमाणे २ टक्कयाची तरतूद करण्याची व आवश्यक तेथे आस्थापना खर्चातील बचत निवृत्ती वेतन खर्चास वापरण्याची (एकूण १७.५ टक्केच्या मर्यादेपर्यंत) गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले. याबाबत सर्वसाधारण चर्चा करण्यात येवून प्रस्ताव मान्य करण्यात आला. यासाठी दि.६.१२.१९८५ च्या शासन निर्णयातील नियम क्र.३ (ब) नुसार पुन्हा शासनाची मान्यता घेण्याची

आवश्यकता नसल्याचेही मान्य करण्यात आले. म्हणजेच पूर्वलक्षी प्रभावाने दि.१.४.२००२ पासून १७.५ टक्के ई.टी.पी. चार्जेसचे सुधारित विवरण खालीलप्रमाणे राहील हा ठराव मान्य करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| आस्थापना खर्च | - | १४ % |
| मध्यवर्ती कार्यालय व लेखा परिक्षण खर्च | - | १ % |
| निवृत्ती वेतन खर्च | - | २ % |
| हत्यारे व अवजारे | - | ०.५ % |
| | | एकूण १७.५०% |

या अनुषंगाने चर्चा करीत असताना असेही ठरविण्यात आले की, ग्रामीण पा.पु. योजना, मध्यम खर्चाच्या नागरी पा.पु.योजना व मोठया खर्चाच्या पा.पु./ मलनिःसारण योजना या बाबत सरसकट १७.५० टक्के ई.टी.पी. चार्जेस न लावता योजनेच्या किंमतीनुसार व संभाव्य व्यवस्थापकीय खर्चाचा विचार करुन टप्पे करण्यात यावेत, व तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली..

**कार्यक्रम बाब क्र. १२ : वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना.**
**वैतरणा नदीवर बहाडोली येथील पुलाचे उर्वरित काम करणेबाबत.**

मजीप्राकडून ज्या कामांच्या निविदा मागविण्यात येतात त्यासाठी फक्त मजीप्राकडे नोंदणीकृत असणा-या कंत्राटदारांनाच पूर्वअर्हता देण्यात येते. तथापि वसई-विरार पाणी पुरवठा योजनेअंतर्गत पुलाचे काम करण्यासाठी मुख्य अभियंता, ठाणे यांनी सर्वंकष आढावा घेवून पुरेशी स्पर्धा व्हावी यास्तव मजीप्रा, राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग व रेल्वे यापैकी कोणत्याही एका यंत्रणेकडे नोंदणीकृत असणा-या कंत्राटदारास व ज्यास विहित पूर्व अनुभव आहेत अशा कंत्राटदारांना निविदेसाठी प्राप्त ठरवण्याची कार्यवाही केली आहे. पुरेशा स्पर्धेसाठी ही बाब गरजेची होती ही वस्तुस्थिती विचारात घेवून या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळावी म्हणून तसेच यापुढे अशा पध्दतीच्या कामासाठी वरीलप्रमाणे अट लागू करण्यास मान्यता मिळावी म्हणून हा प्रस्ताव सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. या प्रकरणी सर्वकष चर्चा करण्यात येवून मुख्य अभियंता, ठाणे यांनी केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे अशा पध्दतीच्या कामासाठी वरीलप्रमाणे कार्यप्रणाली अवलंबण्यात यावी या बाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यासही मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १३ : नाशिक प्रशिक्षण केंद्राचे उपकेंद्र नागपूर येथे सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव.**

नाशिक येथे मजीप्राचे प्रशिक्षण केंद्र आहे त्याच धर्तीवर नागपूर येथे प्रशिक्षण उपकेंद्र सुरु केल्यास ते विदर्भातील ११ जिल्ह्यांचा विचार करता उपयोगी ठरणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या प्रशिक्षण उपकेंद्राचे स्वरुप, रचना व उपयुक्तता याबाबत सर्वकष चर्चा करण्यात येवून नागपूर येथे प्रशिक्षण उप केंद्र सुरु करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या प्रस्तावित उप केंद्रासाठी लागणा-या निधीची मागणी शासनाकडे करण्यासही मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १४ : पुणे येथे प्राधिकरणाच्या मालकीचे विश्रामगृह व चौकीद्वारासाठी निवासस्थान बांधणेबाबत.**

पुणे येथे विश्रामगृह बांधण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला तथापि या विश्रामगृहासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या रु.३८ लक्ष खर्चापैकी रु.६,१२,७३३/- एवढा निधी पुणे महानगरपालिकेकडून मिळणार असल्याने या कामाची अंदाजपत्रके मजीप्राने तयार करुन त्यासाठी निविदा मागविण्यात याव्यात व निविदा देकार स्पर्धात्मक घेऊन हे काम एवढया रकमेत (रु.३८ लक्ष ) संभाव्य खर्चासह होऊ शकत असल्यास पुणे महानगरपालिकेकडून रु.६,१२,७३३/- प्राप्त करुन हे काम मजीप्राने करावे असे ठरविण्यात आले. प्राप्त निविदा देकार रु.३८ लक्ष पेक्षा जास्तीचे असल्यास हे काम पुणे महानगरपालिकेकडून करुन घेण्याचा विचार करता येईल असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १५ : औरंगाबाद येथील सर्व्हे नं.१८३११ उस्मानपुरा येथील प्राधिकरणाच्या जागेभोवती कुंपण भिंत बांधण्याच्या खर्चास प्राधिकरणाची मंजुरी मिळणेबाबत. जि.औरंगाबाद.**

औरंगाबाद येथील सर्व्हे क्र.१८३११ येथे संरक्षक भिंत बांधण्याच्या रु.३,४५,२७०/- खर्चाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व हा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्वतःच्या निधीमधून इमारती व कार्यालये या लेखा शिर्षाअंतर्गत करण्यासही मान्यता देण्यात आली.

या अनुषंगाने चर्चा करीत असताना असेही ठरविण्यात आले की मजीप्राच्या स्वतःच्या निधीमधून जी कामे हाती घेण्यात येतात त्या सर्वच कामासाठी प्राधिकरणाच्या मान्यतेची वाट न पाहता काही अधिकार सदस्य सचिव (तां) यांना द्यावेत. याबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. १६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब.**

मजीप्राच्या निविदा समितीच्या ३८, ३९ व ४० व्या बैठकीमध्ये ज्या कामांच्या निविदा स्वीकृत/अस्वीकृत करण्यात आल्या तसेच त्यावेळी घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात आलेली परिपत्रके व कार्यवाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यात येवून सदर बैठकांध्ये घेतलेल्या निर्णयांना व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीस रीतसर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १७ : घसारा निधीतून /देखभाल दुरुस्ती अंतर्गत असलेल्या निधीतून गोवणे जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्ट्रेशन प्लॅन्टची क्षमता पूर्ववत करण्यासाठी करावयाची कामे.**

मजीप्राच्या अखत्यारितील तारापूर अणू उर्जा प्रकल्प टप्पा-१ व टप्पा-२ तसेच ७ गावे या योजनेकरिता नवीन जलशुध्दीकरण केंद्र बांधण्याची आवश्यकता विशद करण्यात आली. तसेच जलशुध्दीकरण केंद्राच्या

बांधकामासाठी अंदाजित रु. ९७.१२ लक्ष खर्च येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणचा महसूल व खर्च विचारात घेता सुमारे रु.१६२.८९ लक्ष असल्याचे निदर्शनास आणून देवून या पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी असणा-या रु.८३.३२ लक्ष घसारा निधीमधून जलशुध्दीकरण केंद्र बांधण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली. ग्राहकांना शुध्द पा.पु. करणे व या पा.पु. केंद्राच्या ठिकाणचा नफा विचारात घेवून म.जी.प्रा.कडे उपलब्ध असणा-या घसारा निधीमधून नव्याने जलशुध्दीकरण केंद्र बांधण्याच्या रु.९७.१२ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १८ : सोलापूर महापालिकेने त्यांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी हुडकोकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कर्जरोखे वितरीत करण्याबाबत.**

सोलापूर महानगरपालिकेने त्यांच्या पा.पु. योजनेसाठी हुडकोकडे घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी मजीप्राने कर्जरोखे वितरित करावयाचे आहेत. हा निर्णय मंत्रीमंडळाने घेतलेला असून मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार हे कर्जरोखे मजीप्राने निर्गमित करावयाचे असून त्यावरील व्याज व हमीशुल्क दर सहामाहीस हुडकोस सोलापूर मनपाने अदा करणे व मुद्दलाच्या अदायगीची रक्कम २५ टक्के प्रतिवर्षी प्रमाणे एकूण चार वर्षात हुडकोस अदा करावयाची आहे.

मजीप्राने सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने कर्ज उभारणे व त्याची परतफेड सोलापूर महानगरपालिका करेल हे आजवरचा अनुभव पाहता सयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे मजीप्रावर वित्तीय भार येणार नाही याच्या अधीन राहून शासनाचा प्रस्ताव मान्य करावा लागेल हे स्पष्ट करण्यात आले. यावर साधकबाधक चर्चा करण्यात येवून खालीलप्रमाणे ठरावास मान्यता देण्यात आली.

सोलापूर मनपाने हुडको या वित्तीय संस्थास देय असलेल्या रकमेच्या वन टाईम सेटलमेंट प्रस्तावास दि.२५.१०.०२ रोजी राज्य मंत्री मंडळाने दिलेल्या मान्यतेप्रमाणे रु.५४१०.८० लक्ष रकमेचे कर्जरोखे हुडकोस वितरित करण्यास मान्यता देण्यात आली. सदर कार्यवाही करीत असताना मजीप्रावर वित्तीय भार येणार नाही, मजीप्रास सोलापूर महानगरपालिकेकडून यावयाच्या रकमेची व्यवस्था ठरविणे व सोलापूर मनपा याबाबतची पूर्तता करेल याबाबत शासनाने तजवीज करणे याच्या खात्रीनंतरच कर्जरोखे वितरणाबाबतची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १९ : अंबरनाथ वाढीव पाणी पुरवठा योजना (अं.कि.रु.५२२.०० लक्ष) खुल्या बाजारातील कर्जावरील दंडनीय व्याज माफ करण्याबाबत.**

अंबरनाथ वाढीव पा.पु.योजनेसाठी रु.१०० लक्ष निधी खुल्या बाजारातील कर्जाद्वारे उभारण्यात आला होता. तथापि हे उभारण्यात आलेले कर्ज दरसाल १४.५५% व्याज दराने असल्याने व एम.एम.आर.डी.ए.कडून दरसाल ११% व्याज दराने नगरपालिकेला कर्ज उपलब्ध होत असल्याचे नंतर नगरपालिकेला लक्षात आल्याने सदर योजनेसाठी नगरपालिकेला खुल्या बाजारातील कर्ज नको असल्याची नगरपालिकेने भूमिका घेतली.. एम.एम.आर.डी.ए.कडून नगरपालिका या योजनेसाठी कर्ज उचलत असल्याने रु.१००.०० लक्षचे खुल्या

बाजारातील कर्ज मजीप्राने परत घ्यावे व त्यावर दंडनीय व्याज आकारु नये अशी विनंती अंबरनाथ नगरपरिषदेने केली.. याबाबत मा.मंत्री (ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्याकडे दि.२६.३.२००२ रोजी झालेल्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१) अंबरनाथ नगरपालिकेने, मजीप्राने नगरपालिकेच्या योजनेसाठी उभारलेल्या खुल्या बाजारातील कर्ज रु.१००.०० लक्ष नियमित व्याजासह एप्रिल, २००२ अखेर परत करावे.

२) वरीलप्रमाणे अंबरनाथ नगरपालिकेने खुल्या बाजारातील कर्ज सव्याज परत करण्यापोटी त्यांना या कर्ज व्यवहारात दंडनीय व्याज आकारु नये. दंडनीय व्याज माफीचा प्रस्ताव रितसर शासन मान्यतेस्तव सादर करावा.

अंबरनाथ नगरपालिकेने मुद्दा क्र.१ प्रमाणे अंशतः पूर्तता केली असून दि.२९.३.२००३ रोजी नगरपालिकेकडे रु.७,८५,६३७/- (मुद्दल) व रु.३२,२५७/- असे एकूण रु.८,१५,८९४/- अद्याप खुल्या बाजारातील कर्जापोटी येणे आहे.

वरीलप्रमाणे उर्वरीत मुद्दल रक्कम रु.७,८५,६३७/- आणि मुद्दल परत करेपर्यंतच्या दिनांकापर्यंत येणारे (सरळ व्याज पध्दतीने) व्याज अशी एकूण येणे रक्कम अंबरनाथ नगरपालिकेने परत केल्यास, अपवादात्मक विशेष बाब म्हणून, दंडनीय व्याज माफ करण्यास शासनास शिफारशीत करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावावर सर्वंकष चर्चा करण्यात येऊन या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व दंडनीय व्याज वगळता पूर्ण वसुलीनंतर दंडनीय व्याज माफीचा प्रस्ताव मंजुरीसाठी शिफारशीसह शासनास सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २० :** **म.जी.प्रा.मंडळ, रत्नागिरी अंतर्गत रत्नागिरी शहरातील मंडळ कार्यालयासाठी इमारत व अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थानाच्या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

वेळेअभावी या कार्यक्रम बाबीवर चर्चा करता आली नाही त्यामुळे आगामी बैठकीमध्ये हा प्रस्ताव पुन्हा सादर करण्याचे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२१ :** **कर्जरोख्यासंबंधी करण्यात आलेले विविध करार व त्या अनुषंगाने शासन व प्राधिकरणावर येणा-या जबाबदा-या व बंधने.**

वेळेअभावी या कार्यक्रम बाबीवर चर्चा करता आली नाही त्यामुळे आगामी बैठकीमध्ये हा प्रस्ताव पुन्हा सादर करण्याचे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. २२ : राज्य सार्वजनिक उपक्रमानी शिल्लक निधी गुंतविण्यासंबंधी सुधारित मार्गदर्शक तत्वे.**

राज्य सार्वजनिक उपक्रमांनी त्यांच्याकडे शिल्लक असणारा निधी योग्यरितीने गुंतविण्यासाठी शासनाकडून मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतात व त्या आधारे मजीप्राकडील निधी गुतविण्यात येतो. दि.६.८.२००२ रोजी याबाबत शासनाने सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली असून त्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्यात यावी व सदर मार्गदर्शक तत्वानुसार निधी गुंतवण्यात यावा अशा सूचना शासनाने दिलेल्या आहेत. दि.६.८.२००२ नंतर मजीप्राने मा.अध्यक्षांच्या मान्यतेने परंतु दि.६.८.२००२ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सल्ल्याने सदस्य सचिव यांच्या मान्यतेने ज्या निधीची गुंतवणूक करण्यात आलेली आहे त्यास मान्यता देणे व सुधारित मार्गदर्शक तत्वानुसार यापुढे निधी गुंतवणुकीबाबत टप्पे प्रस्तावित असून त्यास मान्यता देण्याची विनंती करण्यात आली. तसेच सन २००१-२००२ ते ऑगस्ट, २००२ पर्यंत केलेल्या गुंतवणूकीस लेखा परिक्षण सूचनेप्रमाणे प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता देण्यास विनंती करण्यात आली. सदर गुंतवणूकीपूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे केल्याचे विशद करण्यात आले. यावेळी मा.अध्यक्षांनी शेडयूल्ड बँकांचे दर व राष्ट्रीयकृत बँकाचे दर यातील तफावत पाहता पेन्शन व तत्सम निधीची दीर्घकाळ गुंतवणूक नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार कमी व्याज उत्पन्न देणारी ठरते असे मत व्यक्त केले व यासाठी शासनास सुधारणा करण्याकरिता प्रस्ताव सादर करण्याचे सूचित केले. या सूचनांनुसार शासनास प्रस्ताव [redacted]

| | | |
|---|---|---|
| सचिव, पा.पु.व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई | - | सदस्य |
| सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | - | सदस्य |

क) अल्पमुदत व दीर्घ मुदतीमध्ये गुंतविण्यात आलेल्या निधीची माहिती मजीप्राच्या संचालक मंडळाच्या नंतरच्या बैठकीमध्ये सादर करण्यात यावी.

वरील प्रस्तावाबाबत सर्वंकष चर्चा करण्यात येवून त्यास मान्यता देण्यात आली. तसेच दि.६.८.२००२ च्या शासन निर्णयानंतर गुंतवण्यात आलेल्या निधीबाबतची जी माहिती सादर करण्यात आली त्यासही रीतसर मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या अनुषंगाने असेही ठरविण्यात आले की शेडयूल बँकाकडे निधी गुंतविणे किंवा ज्यांची पत खूपच चांगली आहे, वा राज्यशासनाच्या रोख्यामध्ये ज्या बँकांनी निधी गुंतविला आहे त्यांच्याकडेही निधी गुंतविण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करावा.

कार्यक्रम बाब क्र. २३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांचे गोपनीय अहवालाचे संस्करण करणारे प्राधिकारी आणि संस्करणाअंती झालेल्या अभिवेदनावर अपिलीय प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

शासकीय अधिकारी व कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालाचे शासन स्तरावर दि.१.२.१९९६ व २९.७.१९९३ च्या शासन निर्णयानुसार संस्करण करण्यात येतील. या शासन निर्णयानुसार मजीप्राच्या अधिकारी/कर्मचा-यांच्याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतु गोपनीय अहवालाच्या संस्करणाबाबत मजीप्राच्या अधिका-यांना सुस्पष्ट आदेश काढणे आवश्यक असून त्याबाबतच्या स्तराचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याचे विशद करण्यात आले. या अनुषंगाने चर्चा करण्यात येवून मजीप्राचे अध्यक्ष, सदस्य सचिव व इतर अधिका-यांना संस्करण अधिकारी व अपीलीय अधिकारी म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. याबाबतचे सुस्पष्ट आदेश मजीप्राने सत्वर निर्गमित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यक्रम बाब क्र. २४ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना शिक्षा बजावणे व त्या शिक्षेविरुध्द अपील करणारे प्राधिकारी निश्चित करणे, अधिकार प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम १९९८ अंतर्गत कार्यालय प्रमुख, विभाग प्रमुख, प्रादेशिक प्रमुख व प्रशासकीय प्रमुख या धर्तीवर मजीप्राच्या अधिका-यांचा दर्जा घोषित करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच नियम १० नुसार किरकोळ शिक्षा व नियम-८ खाली जबर शिक्षा झाली असल्यास त्या शिक्षेविरुध्द अपीलीय अधिकारी म्हणून जे अधिकारी असतील त्यांचे जे विवरण सादर करण्यात आले त्यावर चर्चा करण्यात येवून तो प्रस्ताव मान्य करण्यात आला. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड करण्यात आलेल्या अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी संदर्भात आवश्यक ती सल्लामसलत आयोगाशी करुन निर्णय घेण्याच्या प्रस्तावास देखील मान्यता घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

कार्यक्रम बाब क्र. २५ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सिडकोभवन (दक्षिण कक्ष) येथील दोन मजल्यावरील २४००० चौ.फूट जागा भाडे तत्वावर देणेबाबत.

मजीप्राच्या सिडको भवन येथील (दक्षिण कक्ष) दोन मजल्यावरील आवश्यकतेप्रमाणे २४००० चौ.फूट जागा भाडेतत्वावर देण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. या संबंधीची सर्व कार्यवाही करण्याबाबत व निर्णय घेण्याबाबत खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यासही मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| सदस्य सचिव | - | अध्यक्ष |
| सदस्य सचिव (तां) | - | सदस्य |
| वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी | - | सदस्य |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी | - | सदस्य |

मात्र उपरोक्त समितीच्या निर्णयास अंतिमरित्या मजीप्राच्या संचालक मंडळाची मान्यता घेणे बंधनकारक राहील असेही ठरविण्यात आले. या अनुषंगाने असेही निर्देशित करण्यात आले की, मजीप्राच्या ज्या जागा व्यापारी तत्वावर विकसित करणे शक्य आहे त्यांचा त्वरित आढावा घेवून तसा प्रस्ताव मजीप्राच्या पुढील बैठकीमध्ये सादर करावा.

**कार्यक्रम बाब क्र. २६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पॅनेलवरील वकीलांच्या नेमणूकीचे विनियम २००१.**

मजीप्राच्या पॅनेलवरील वकिलांच्या नेमणूकीचे विनियम काय असावेत, तसेच या नेमणुकीची कार्यप्रणाली काय असावी याबाबत कोणत्या स्तरावर काय अधिकार असतील इत्यादिची माहिती या कार्यक्रम बाबीद्वारे सादर करण्यात आली असून मजीप्राच्या पॅनेलवरील वकिलांच्या नेमणुकीबाबतच्या कार्यप्रणालीस मान्यता देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली. यावर सर्वसाधारण चर्चा करण्यात येवून या कार्यक्रम बाबीद्वारे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र.२७ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती योजना लागू करण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. मात्र या योजनेस फारसा प्रतिसाद मिळणार नाही तसेच या योजनेचा १०० टक्के भार शासनाने उचलणे या प्रस्तावासही शासन स्तरावरुन मान्यता मिळणार नाही. या बाबी विचारात घेवून मजीप्राच्या कर्मचा-यांसाठी लागू करण्याच्या स्वेच्छा निवृत्ती योजनेचा प्रस्ताव आहे त्या स्वरुपात मान्य करण्याऐवजी सर्वंकष फेरविचार करुन प्रस्ताव पेरसादर करावा.

**कार्यक्रम बाब क्र.२८ : मीरा-भाईंदर अतिरिक्त ५० द.ल.लि.क्षमतेची पाणी पुरवठा योजना कंत्राट क्र.बी-१/३८ व बी-१/३९ अंतर्गत कंत्राटदारावर केलेली दंडात्मक कारवाई कंत्राटदारांच्या समस्या त्या अनुषंगाने करावयाची कारवाई समितीची नियुक्ती व त्यांचा अहवाल.**

मीरा-भाईंदर अतिरिक्त ५० द.ल.लि. क्षमतेच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कंत्राट क.बी-१/३८ व बी-१/३९ च्या कंत्राटदारास जो दंड करण्यात आला त्याबाबतची सर्व वस्तुस्थिती विचारात घेवून अडचणी व दंडात्मक कारवाई यांची सांगड घालून दंडात्मक कारवाईचा पुनर्विचार करणे तसेच या कंत्राटापोटी द्यावयाची भाववाढ व उर्वरित कामे कशा पध्दतीने पूर्ण करावीत याबाबत शिफारस करण्यासाठी निवृत्त सचिव, वा त्या समान दर्जाच्या अधिका-यांची समिती गठीत करण्याचा निर्णय मजीप्राच्या ९३ व्या बैठकीमध्ये घेण्यात आला होता. या अनुषंगाने श्री.श.रा.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठन करण्यात आली. व श्री.एस.एस.पटवर्धन, निवृत्त सदस्य सचिव, म.जी.प्रा. हे या समितीचे सदस्य होते. या समितीने या प्रकरणीचा सर्वंकष अभ्यास करुन ज्या शिफारशी सादर केल्या आहेत त्याची माहिती कार्यक्रम बाबीद्वारे सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. या कामामधील अडचणी, विविध खात्यांच्या परवानगी मधील विलंब, जागा मिळण्यातील विलंब व मीरा- भाईंदर पाणी प्रश्नाची तीव्रता इ. बाबी विचारात घेवून कंत्राटदारावर करण्यात आलेली दंडाची कारवाई समर्थनीय नसल्याची शिफारस समितीने केलेली असून वसूल करण्यात

याबाबतची आकडेवारी तपासून बघणे जरुरीचे आहे. कारण वर नमूद केलेली वाढ तपासणे अंती तितकीच राहील असे नाही. त्यामुळे सध्या नुकत्याच संपलेल्या दर करारातील दराने (तात्पुरत्या स्वरुपात) पुरवठा करावा आणि नवीन दरकरार अस्तित्वात येण्यापूर्वी प्राधिकरणाने या पाईप्स पुरवठयासाठी खुल्या निविदा मागवाव्यात. त्यानुसार येणारे दर अथवा वर नमूद केलेली परंतु तपासणीनंतर येणारी ग्राहय वाढ किंवा डी.जी.एस.डी.च्या नवीन दरकरारातील दर यापैकी जे किमान दर असतील त्यानुसार आताच्या तात्पुरत्या पुरवठयाचे अंतिम दर ठरवून फरकाबाबत अदायगी करण्यात येईल. या अटीवर सध्या संपलेल्या दरकरारातील दरानुसार (तात्पुरते दर) पुरवठा घेण्याचे आणि या अटीस पुरवठादार / उत्पादक कंपन्यांची मान्यता घेऊनच पाईप्स पुरवठयाचे आदेश द्यावेत असे ठरले. तसेच, वरील वाढीचे समर्थन तपासणे व मजीप्रा स्तरावर पाईप्स पुरवठयांच्या निविदा मागविणे याबाबतची कार्यवाही तीन महिन्यात पूर्ण करुन दर निश्चित करण्यांत यावेत. मध्यंतरीच्या काळात डी.जी.एस.डी.चा दरकरार झाल्यास सदर दराशी वरील दराशी तुलना करुन निर्णय घेण्यात यावा. तथापि डी.जी.एस.डी.च्या दरकरारास विलंब लागणार असल्यास वर नमूद केलेली दरातील वाढ (समर्थनीय ठरणारी) व निविदेनुसार येणारे दर यापैकी जे दर कमी असतील त्या दराने उत्पादक कंपन्यांना देयके (तात्पुरते स्वरुपात) अदा करावीत आणि डी.जी.एस.डी.चे दरकरार जेव्हां अंतिम होतील तेव्हां त्यामधील दर वरील दरापेक्षा कमी असल्यास दरातील तफावतीनुसार उत्पादक कंपन्यांकडून वसुली करण्यात यावी असेही ठरले.

क) मुद्दा क्र.ब नुसार जो फरक अदा करण्यात येईल त्यावर कोणतेही व्याज दिले जाणार नाही यासही पुरवठादार कंपन्यांची मान्यता घ्यावी.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** **शहाड येथील प्रक्रियापूर्व पाण्याचे उदंचन केंद्र व टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रासह प्रक्रियोत्तर पाण्याच्या उदंचन केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराच्या देयकातून वसुली परत करणेबाबत.**

वेळेअभावी या कार्यक्रम बाबीवर चर्चा करता आली नाही. त्यामुळे हा प्रस्ताव मजीप्राच्या आगामी बैठकीमध्ये सादर करण्याचे ठरविण्यात आले.

या बैठकीमध्ये खालील मुद्यांबाबतही चर्चा करण्यात आली.

१) मजीप्राकडे अनुकंपा तत्वावर कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबतचा सर्वंकष प्रस्ताव त्वरित मान्यतेसाठी सादर करावा.

२) मजीप्राच्या थकबाकीपोटी महानगरपालिका/ नगरपरिषदांच्या संविधानिक अनुदानामधून कपात करण्यात येणारी रक्कम शासनाकडून प्राप्त व्हावी यासाठी पाठपुरावा करावा.

३) जिल्हा परिषदांकडून मजीप्रास जी थकबाकी प्राप्त व्हावयाची आहे त्याच्या वसुलीपोटी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून वसुली होईल असे पहावे.

४) जेजुरी तातडीच्या पा.पु. योजनेत अडचण असल्यास त्वरित दूर करण्यात यावी. मात्र या योजनेद्वारे नियोजित वेळेत कोणत्याही परिस्थितीत पा.पु. सुरु झाला पाहिजे याची खबरदारी घेण्यात यावी.

५) एम.पी.डब्ल्यू. ॲडव्हान्स कमी करणेबाबत सत्वर कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त चर्चेनंतर मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित केले.

बैठक २९.९४

९०६

(१८)

## कार्यक्रम बाब क्र. २४

**विषय :** प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना शिक्षा बजावणे व त्या शिक्षेविरुध्द अपील करणारे प्राधिकारी निश्चित करणे- अधिकार प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे महामंडळ आहे. मात्र प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम १९९८ हे शासनाचे नियम जसेच्या तसे लागू करुन अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून घडलेल्या गैरवर्तनाची जबाबदारी निश्चित करुन त्याप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येते. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ सुधारित नियम १९९८ नुसार त्या नियमामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येते. शासन स्तरावर शिक्षा बजावणेस म.ना.से. (शिस्त व अपील) १९७९ मधील नियम ६ मध्ये सक्षम अधिकारी प्राधिकृत करण्यांत आले आहेत. त्याच धर्तीवर प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिक्षा बजावण्यात येत होती. परंतू, हे प्राधिकारी निश्चित करतांना ब-याच वेळा संभ्रम निर्माण होतो. प्राधिकरणांतील अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून सक्षम अधिकाराबद्दलच प्रश्नचिन्ह निर्माण केले जाते. प्राधिकरणाचे कामकाज महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ नुसार नियंत्रित केले जाते व त्या अधिनियमातील कलम ८ (१) नुसार प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांच्या नेमणूका करण्याचे अधिकार हे प्राधिकरणास म्हणजेच संचालक मंडळास आहेत.

सर्वसाधारण परिस्थितीमध्ये नेमणूक करण्यास सक्षम असणाऱ्या अधिकाऱ्याने अन्य प्राधिका-यास अधिकार प्रदान केल्याखेरीज अशी शिस्तभंगाची कार्यवाही त्या नेमणूक करणा-या प्राधिका-याशिवाय अन्य अधिका-यास करता येत नाही. यास्तव म.ना.से.(शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम १९९८ व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ८(१) मधील तरतूदींमध्ये सुसंगती राखण्याकरिता प्राधिकरणाने प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यांस विनिर्दिष्ट सक्षम प्राधिकारी नामनिर्देशित करणे गरजेचे आहे. न्याय प्रविष्ठ प्रकरणांमध्ये देखील एखादया विशिष्ट प्रकरणांमध्ये नामनिर्दिष्ट प्राधिकारी हे शिक्षा बजावण्यास सक्षम आहेत किंवा कसे याचा तपशील न्यायालयासमोर सादर करणे आवश्यक आहे. परंतू, त्यासाठी असे अधिकार हे संचालक मंडळाकडून प्राधिकरणातील नामनिर्देशित अधिका-यास प्रदान करणे गरजेचे आहे. संचालक मंडळात उक्त अधिनियमाच्या कलम ११ नुसार असे अधिकार प्रदान करण्याची तरतूद करण्यांत आलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम १९९८ नुसार विहित करण्यात आल्याप्रमाणे अधिकारी/कर्मचा-यांविरुध्द जबरी शिक्षा आणि गौण स्वरुपाची शिक्षा बजावण्यासाठी विहित केलेली कार्यपध्दती अनुसरुन अंतीमतः ज्या शिक्षा बजावता येतात त्यानुसार :-

१. **जबर शिक्षा :-**

अ. सेवेतून काढून टाकणे, मात्र भावी काळात शासकीय नोकरी मिळण्याच्या दृष्टीने ही अनर्हता ठरणार नाही.

ब. सक्तीची सेवा निवृत्ती.

क. सेवेतून बडतर्फ करणे, मात्र भावी काळात शासकीय नोकरी मिळण्याच्या दृष्टीने ही अनर्हता ठरेल.

२. **गौण शिक्षा :-**

अ. उपका ठेवणे

ब. पदोन्नती रोखणे, विनिर्दिष्ट कालावधीकरिता पदावनत करणे.

क. अधिकारी/कर्मचा-यांच्या निष्काळजीपणामुळे झालेली कोणत्याही आर्थिक स्वरुपाच्या हानीची संपूर्ण रक्कम वा तिचा भाग वसूल करणे.

ड. वेतनवाढ रोखून ठेवणे.

ई. पदोन्नती रोखून ठेवणे.

फ. ज्या समय वेतनश्रेणीमध्ये/पदावर श्रेणीमध्ये किंवा सेवेमध्ये असेल त्यापेक्षा खालच्या समय वेतनश्रेणीमध्ये/पदावर श्रेणीमध्ये/सेवेमध्ये आणणे.

१. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम १९९८ हे प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्यांत आले आहेत. या नियमातंर्गत कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख यांना विशिष्ट असे अधिकार प्राधिकृत करण्यात आले आहेत. त्यानुसार प्राधिकरणात कार्यवाही अनुसरतांना मूळ नियमांना बाधा न येता केवळ वर परिच्छेद १ मध्ये स्पष्ट केलेली वस्तुस्थिती व परिस्थिती लक्षात घेवून विसंगती राहू नये या दृष्टीकोनांतून प्राधिकरणांत कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख जाहीर करणे आवश्यक आहे. याकरिता, प्राधिकरण आता खालीलप्रमाणे कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख व प्रशासकीय प्रमुख घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **कार्यालय प्रमुख** | - | **कार्यकारी अभियंता** |
| २. | **विभाग प्रमुख** | - | **अधीक्षक अभियंता** |
| ३. | **प्रादेशिक विभाग प्रमुख** | - | **मुख्य अभियंता** |
| ४. | **प्रशासकीय प्रमुख** | - | **सदस्य सचिव** |

२. वरीलप्रमाणे जाहीर करण्याचे प्रस्तावित असले तरी प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना शिक्षा बजावण्यास आणि बजावलेल्या शिक्षेविरुध्द अपील करण्यास सक्षम असणारे प्राधिकारी निश्चित करणे आवश्यक आहे आणि त्यांना तसे अधिकार प्रदान करण्याकरिता परिशिष्ट 'अ' मधील प्रस्ताव संचालक मंडळाच्या विचारार्थ मांडण्यात येत आहे.

३. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द सेवानिवृत्तीनंतर शिस्तभंगविषयक कार्यवाही करावयाची प्रस्तावित असेल तर म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम २७ च्या पोटनियम (२) (ब) (एक) नुसार शासनाची मान्यता घ्यावी लागते. याच धर्तीवर प्राधिकरणांतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत शिस्तभंगविषयक कार्यवाहीसाठी मंजूरी देण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या अध्यक्षांना देण्याचे प्रस्तावित असून तसा प्रस्ताव संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहे.

ठरावः-

१. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम,१९९८ हे प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्यांत आले आहेत. या नियमांतर्गत कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख/प्रादेशिक विभाग प्रमुख यांना विशिष्ट असे अधिकार प्राधिकृत करण्यांत आले असून त्या धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिका-यांना खालीलप्रमाणे घोषित करण्यांत येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालय प्रमुख | - | कार्यकारी अभियंता |
| २. | विभाग प्रमुख | - | अधीक्षक अभियंता |
| ३. | प्रादेशिक विभाग प्रमुख | - | मुख्य अभियंता |
| ४. | प्रशासकीय प्रमुख | - | सदस्य सचिव |

२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ आणि सुधारित नियम १९९८ मधील नियम १० नुसार किरकोळ शिक्षा व नियम ८ खाली जबर शिक्षा बजावल्यास आणि बजावलेल्या शिक्षेविरुध्द आणि अपील करण्यांस सक्षम असणारे प्राधिकरणाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/व प्राधिकरणातील अधिका-यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे अधिकार प्रदान करण्यांत येत आहे.

३. प्राधिकरणांतील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत शिस्तभंगविषयक कार्यवाहीसाठी मंजूरी देण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या अध्यक्षांना देण्यांत येत आहेत.

४. जबर शिक्षा करण्यांस सक्षम असणारे प्राधिकारी हे त्या-त्या संबंधित संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या निलंबन विषयक कार्यवाहीबाबत सक्षम प्राधिकारी राहतील.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ व सुधारित नियम १९९८ च्या नियम १२(१) नुसार एकत्रित कार्यवाही अनुसरतांना त्या अधिकारी/कर्मचारी यामध्ये जो वरिष्ठ असेल त्यासाठी जे प्राधिकरण वरीलप्रमाणे सक्षम असेल तेच प्राधिकरण सर्वांच्या बाबतीत सक्षम असेल.

६. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड करण्यात आलेल्या अधिका-यांच्याविरुध्द विभागीय चौकशी संदर्भात आवश्यक ती सल्लामसलत, आयोगाशी करण्यांत येईल.

k.B.Esst.१-khade/CAO-KRC

# परिशिष्ट 'अ'

| अ.क्र | ज्या अधिकारी/ कर्मचा-याला शिक्षा बजवावयाची आहे तो अधिकारी/ कर्मचारी | किरकोळ शिक्षा बजाधण्यास सक्षम असणारे शिस्तभंग विषयक प्राधिकारी | किरकोळ शिक्षेविरुध्द अपीलीय प्राधिकारी | जबर शिक्षा बजावण्यास सक्षम असणारे शिस्तभंग विषयक प्राधिकारी | जबर शिक्षेवि[रुध्द] अपीलीय प्राधि[कारी] |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | अ.अ./मु.अ./ वि.कार्य अधिकारी/ उप मुख्य लेखा अधि. / मु.प्र.अ. | सदस्य सचिव | अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | मा.मंत्री, पा.पु. (सचिवांमार्फत) |
| २ | का.अ. (क्षेत्रीय) | मुख्य अभियंता | सदस्य सचिव | सदस्य सचिव | अध्यक्ष,महाराष्ट्र प्राधिकरण |
| ३ | का.अ. (केंद्रीय) | सदस्य सचिव | उपाध्यक्ष व राज्यमंत्री,पा.पु.व स्व. | उपाध्यक्ष व राज्यमंत्री,पा.पु.व स्व | अध्यक्ष,म[हारा]ष्ट्र प्राधिकरण |
| ४ | आ.अ.(द)/प्र.नि.आ.अ./ का.व का.अ. /उप अभि. / सहा.अभि. श्रे.१ (केंद्रीय) | सदस्य सचिव | उपाध्यक्ष व राज्यमंत्री,पा.पु.व स्व. | उपाध्यक्ष व राज्यमंत्री,पा.पु.व स्व. | अध्यक्ष,महाराष्ट्र प्राधिकरण |
| ५ | वरिष्ठ लेखा अधि./अंतर्गत लेखा परिक्षण अधि./लेखा अधि./सहा.लेखा अधि. /परिव्यय लेखा अधि. | वि.स.मु.ले.अ. | सदस्य सचिव | सदस्य सचिव | उपाध्यक्ष व राज्यमंत्री,पा.पु.[व] |
| ६ | उप अभियंता/ सहा.अभि. श्रेणी-१ /सहा.लेखा अधि./ सहा.लेखा परिक्षण अधि./लेखा अधि /शाखा अभि./स.अ.श्रे.२(क्षेत्रीय) | अ.अ./मु.अ. | मुख्य अभियंता/ सदस्य सचिव | मुख्य अभियंता | सदस्य सचिव |
| ७ | विशेष अधीक्षक (क्षेत्रीय) | मुख्य अभियंता | सदस्य सचिव | सदस्य सचिव | उपाध्[यक्ष व] राज्यमंत्री,पा.प. |
| ८ | कक्ष अधिकारी/शा.अ./ स.अ.श्रे.२, (केंद्रीय) | मुख्य प्रशासकीय अधि. | सदस्य सचिव | सदस्य सचिव | उपाध्यक्ष व राज्यमंत्री,पा.प. |
| ९ | तांत्रिक/अतांत्रिक वर्ग-३ कर्मचारी (क्षेत्रीय) | का.अ./अ.अ./ मु.अ. | अ.अ./मु.अ./स.स. | अ.अ./मु.अ. | मुख्य अभियंता/[स.स.] |
| १० | वर्ग-३(केंद्रीय) | आ.अ.(दक्षता) | मुख्य प्रशासकीय अधि. | मुख्य प्रशासकीय अधि. | सदस्य सचिव |
| ११ | वर्ग-४(क्षेत्रीय) | का.अ./अ.अ./ मु.अ. | अ.अ./मु.अ./ स.स. | अ.अ./मु.अ. | मु.अ./स.स. |
| १२ | वर्ग-४(केंद्रीय) | प्र.नि.आ.अ. | आ.अ.(दक्षता) | आ.अ.(दक्षता) | मुख्य प्रशासकीय |